23 JUL 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

हवामान केंद्र उभारणार : 'आयआयटीएम'समवेत सामंजस्य करार

# शिवाजी विद्यापीठात हवामान संशोधनाला मिळणार बळ

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : केंद्रीय पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपीकल मेट्रॉलॉजी (आयआयटीएम) या संस्थेसमवेत शिवाजी विद्यापीठाने सामंजस्य करार केला. यामुळे हवामानविषयक आधुनिक संशोधनाच्या अनुषंगाने दोन्ही संस्थांमध्ये आदानप्रदान होणार आहे.

आयआयटीएम ही देशातील एक प्रमुख वैज्ञानिक संशोधन संस्था आहे. या कराराच्या माध्यमातून विद्यापीठ परिसरात आणि पन्हाळा येथील विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्र परिसरात वेदर स्टेशन बसवण्यात येणार आहेत. पुढे टप्प्याटप्प्याने या स्टेशनची संख्या वाढविण्यात येईल.



केंद्रीय पृथ्वी मंत्रालयाच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपीकल मेट्रॉलॉजी या संस्थेसमवेत शिवाजी विद्यापीठाने सामंजस्य करार केला. यावेळी कुलगुरु डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. एस. डी. पवार, डॉ. एम. एन. पाटील, डॉ. टी. धर्मराज, डॉ. सचिन पन्हाळकर, आदी उपस्थित होते.

या करारावर कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत आयआयटीएमचे संचालक डॉ. आर. कृष्णन आणि विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी स्वाक्षरी केली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, समन्वयक डॉ. सचिन पन्हाळकर, शास्त्रज्ञ डॉ. एस. डी. पवार, शास्त्रज्ञ डॉ. एम. एन. पाटील, डॉ. टी. धर्मराज, डॉ. दादा पी. नाडे, डॉ. सोमनाथ पवार उपस्थित होते.

> विद्यापीठाने हवामान बदल व शाश्वतता अभ्यास केंद्राची स्थापना करून हवामान बदलाच्या अनुषंगाने संशोधनावर गांभीर्यपूर्वक लक्ष केंद्रित केले आहे. विद्यापीठाने हवामान बदलाबाबत निर्धारित केलेली शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्याच्या दृष्टीने हा करार महत्त्वाचा ठरणार आहे.
>
> - डॉ. डी.टी. शिर्के, कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ.

2 3 JUL 2023

जनसंपर्क कक्ष

SUNDAY TIMES शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Shivaji varsity repeals mandate of completing degree in 6 years

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** SUK has waived its mandate of completing a degree course within a six-year period.

SUK's Registrar (in-charge) Dr Vikas Shinde said that earlier, if a graduate-level student failed in any subject in a a semester, he/she was required to retake the particular exam within six years.

If the student fails to do so, he will take a fresh admission in the respective class and retake the examinations for all the subjects of that particular year. The said condition has now been cancelled.

File photo



This decision will be beneficial for the students who had to drop out of their courses

Also, B.A., B.Com., or B.Sc. regular or distance students were required to complete the relevant course within six years. Failing to do so would result in cancellation of his entire degree-course. He would then had to retake the exam for all three years. This penalty has also now been cancelled.

"Things have changed in accordance with the National Education Policy. Students can take academic credits as per the National Education Policy and add them in the Academic Bank of Credit," added Shinde.

This decision will be highly beneficial for the students who had to drop out of their colleges due to financial or some other reasons,

लोकमत

# सोलापूरसाठी शिवाजी विद्यापीठातून सात अर्ज

## रिक्त कुलगुरू पदासाठी निवड प्रक्रिया

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी शिवाजी विद्यापीठातील सात प्राध्यापकांनी अर्ज केले आहेत.

सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. मृणालिनी फडणवीस यांची पाच मे ला कारकीर्द संपली असून रिक्त कुलगुरुपदाचा अतिरिक्त कार्यभार डॉ. रजनीश कामत यांच्याकडे सोपविला आहे. सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी शिवाजी विद्यापीठातील पदार्थविज्ञान विभागाचे प्रा. विजय फुलारी, रसायनशास्त्र विभागातील प्रा. जी. बी. कोळेकर, प्रा. एस. एस. चव्हाण, वनस्पतीशास्त्र (बॉटनी) विभागातील प्रा. डी. के. गायकवाड, वाणिज्य व व्यवस्थापन विभागातील प्रा. श्रीकृष्ण महाजन, जैवतंत्रज्ञान विभागाच्या प्रा. ज्योती जाधव, जर्नालिझम विभागातील प्रा. निशा मुडे -पवार यांनी अर्ज केले आहेत. आलेल्या अर्जांची निवड समितीकडून छाननी होऊन पुढील प्रक्रिया राबविली जाणार आहे.